प्रेस नोट

प्रति,

------------------

------------------

**जळगावात रेल्वे ब्रिज दुरुस्तीचे काम लांबणीवर, रोड डायव्हर्शन मध्ये आणखी मुदतवाढ**

जळगांव शहराचे बाहेरील मुंबई ते नागपुर जाणारा महामार्गावर भुसावळ कडुन आसोदा कडेस जाणारा रेल्वेब्रिज वरिल रस्ता तसेच पाळधी कडुन भुसावळ कडेस जाणा-या सुरत रेल्वे ब्रिज वरिल रस्ता दिनांक ३०/०७/२०२६ ते दिनांक ३१/०७/२०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टीने खचलेला आहे. त्याची डागडुजी व दुरुस्तीचे काम सुरु असुन वाहतुक दिनाक १२/०८/२०२६ चे ००.०१ ते दिनांक २५/०८/२०२६ चे २४.०० वाजे पावेतो वाहतुक जळगांव शहरातुन मा पोलीस अधीक्षक कार्यालया कडील जा.क्र.५७५/२०२६ दिनांक १२/०८/२०२६ अन्वये अधिसुचना जारी करुन तात्पुरत्या कालावधी करीता वाहतुक वळविण्यात आली होती. त्याची मुदत आज रोजी २४.०० वाजता डायव्हर्शनची मुदत संपत आहे.

सदरहु डागडुजी व दुरुस्तीचे काम करणा-या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कार्यालय जळगांव यांच्या कडील जा.क्र.१३०३२/NHAI-PIU-जळगांव-NH-५३/T-F/२०२६-२०२७/११३९ दिनांक १२/०८/२०२६ अन्वये लेखी पत्राव्दारे मा पोलीस अधिक्षक कार्यालय जळगांव यांना माहिती दिली आहे की, सदर उखडलेल्या रस्त्याचे काम सुरु असुन धुळे कडुन नागपुर कडेस जाणारा एकेरी मार्ग हा दिनांक २३/०८/२०२६ रोजी चालु करण्यात आहे. त्यानुसार तरसोद फाटा ते पाळधी गाव दरम्यानचा महामार्गावरील/बायपास वाहतुकीत तात्पुरता खालील प्रमाणे बदल करणे गरजेचे असल्याने मुदतवाढ करणारी अधिसुचना मा पोलीस अधीक्षक मा श्रीकांत धिवरे यांनी जारी केल्याने संबंधीत पोलीस स्टेशनला माहिती देण्यात आलेले आहे. वाहतुकीत बदल करण्याच्या ठिकाणी अपघात होवु नये म्हणुन योग्य बंदोबस्त नेमण्यात आला आहे. सुरक्षीत वाहतुकीसाठी पर्यायी मार्गाचा खालील प्रमाणे वापर करण्यात यावा अशी विनंती शहर वाहतक शाखा जळगांव व जिल्हा पोलीस प्रशासना कडुन सर्व वाहन चालक व मालक सर्व सामान्य जनतेस करण्यात येत आहे.

**१.भुसावळ/नागपुर कडुन धुळे/मुंबई कडेस जाणारी वाहने**

पर्यायी मार्ग- भुसावळ- तरसोद फाटा-कालींका माता मंदीर-अजिंठा चौफुली- आकाशवाणी चौक- शिवकॉलनी- बांभोरी पुल-पाळधी धुळे मार्गे वळविण्यात आलेली आहे.

**२.छ.संभाजीनगर कडुन नागपुर कडेस जाणारी वाहने**

पर्यायी मार्ग - छ.संभाजीनगर-पहुर-जामनेर-नाहटा चौफुली भुसावळ मार्गे नागपुर वळविण्यात आलेली आहे.

**३. नागपुर कडुन छ. संभाजीनगर कडेस जाणारी वाहने**

पर्यायी मार्ग - नागपुर-भुसावळ-नाहटा चौफुली-जामनेर- गपहुर-छ.संभाजीनगर मार्गे वळविण्यात आलेली आहे.

**४.इंदौर/बडोदा/नंदुरबार कडुन भुसावळ/नागपुर कडेस जाणारी वाहने**

पर्यायी मार्ग - चोपडा-अडावद-यावल- भुसावळ मार्गे नागपुर वळविण्यात आलेली आहे.

**५.नागपुर/भुसावळ कडुन नंदुबार/बडोदा/इंदौर कडेस जाणारी वाहने**

पर्यायी मार्ग - भुसावळ-यावल-अडावद-चोपडा मार्गे वळविण्यात आलेली आहे.

पर्यायी मार्ग वापर करण्याचे आदेश मा पोलीस अधिक्षक सो यांनी दिलेले आहे.

वरील प्रमाणे रस्त्याच्या पर्यायी मार्ग वापर करण्याचे आदेश मा पोलीस अधिक्षक सो यांनी दिलेले आहे.

तरी वरिल प्रमाणे वृत्त आपल्या दैनिक वृत्तपत्रात व प्रसार माध्यमाव्दारे प्रकाशित व प्रसारीत होणेस विनंती आहे.

प्रभारी अधिकारी

शहर वाहतुक शाखा जळगांव